पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा
स्थानिक गुन्हे शाखा
93 मल्हारपेठ सातारा - 415001 (Maharashtra) Ph- 02162-233923
(ई-मेल - sp.satara@mahapolice.gov.in, pilcb.satara@mahapolice.gov.in)

# प्रेस नोट ता. 17/12/2025

## (स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांची कारवाई)

## पवनचक्कीमधील तांब्याच्या तार असलेल्या केबल वायरची चोरी करणारी टोळी जेरबंद करुन त्यांचेकडुन चोरीचे पाच गुन्हे उघड करुन एकुण 18,80,014 रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त.

---

दिनांक 08/02/2025 ते दिनांक 06/12/2025 रोजीचे दरम्यान सडावाघापुर व सडादाडोली परिसरातील सुझलॉन कंपनीच्या पवनचक्क्यांमधील तांब्याच्या तारा असलेल्या केबल वायरची चोरी झाले बाबत पाटण पोलीस ठाणे तक्रार प्राप्त झाल्याने त्याप्रमाणे पाटण पोलीस ठाणे येथे गुरनं. 195/2025 भा.न्या.सं.क. 303(2) सह भारतीय विद्युत अधिनियम कलम 136 प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.नमुद गुन्हयाचे अनुशंगाने तसेच यापुर्वी देखील पवनचक्कीमधील केबल वायर चोरी झालेली असल्याने श्री.तुषार दोशी पोलीस अधीक्षक,सातारा व श्रीमती डॉ. वैशाली कडुकर अपर पोलीस अधीक्षक ,सातारा यांनी नमुद गुन्ह्यासह पवनचक्कीमधील केबल वायर चोरीचे गुन्हे करणारे आरोपींची माहिती काढुन सदरचे गुन्हे उघडकीस आणणे बाबतच्या सुचना अरुण देवकर पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा,सातारा यांना दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे अरुण देवकर पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा,सातारा यांनी सहा.पोलीस निरक्षक श्री. रमेश गर्जे व रोहित फार्णे यांचे अधिपत्याखाली विशेष पथक तयार करुन अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या आरोपींची माहिती काढुन सदरचे गुन्हे उघडकीस आणण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

दिनांक 14/12/2025 रोजी अरुण देवकर पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा,सातारा यांना त्यांचे गोपनिय बातमीदारा मार्फत खात्रीशीर बातमी मिळाली की, पवनचक्कीमध्ये चोरीस गेलेली केबल वायर ही दत्ता झोरे रा.सडावाघापुर, सारीश सावळवाडे रा.सडावाघापुर,निलेश सुर्यवंशी रा.पाबळवाडी व प्रमोद निकम रा.मसुर यांनी केली आहे.अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यांनी सदरची माहिती सहा.पोलीस निरीक्षक रमेश गर्जे व रोहित फार्णे यांना नमुद इसमाना ताब्यात घेवुन त्यांचेकडे विचारपूस करुन पुढील कारवाई करणेबाबत मार्गदर्शन करुन सुचना दिलेल्या होत्या. त्याप्रमाणे सहा.पोलीस निरीक्षक रमेश गर्जे व रोहित फार्णे यांचे पथकाने पाटण, मसुर व कराड परिसरातुन नमुद इसमांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे विचारपूस केली असता त्यांनी सडावाघापुर, दाडोली, राजापुरी, पाडेकरवाडी, घाटेवाडी, मालोशी, बामणेवाडी, भांबे या परिसरातील सुझलॉन कंपनीच्या पवनचक्क्यांमधील तांब्याच्या तारा असलेल्या केबल वायर चोरी केल्याचे कबुली दिल्याने त्यांचेकडुन पाटण पोलीस ठाणे गुरनं. 195/2025 सह सातारा तालुका पोलीस ठाणेचे गुरनं.131/2025 व 439/2025 तसेच उंब्रज पोलीस ठाणचे गुरनं. 05/2025 व 362/2025 असे एकुण 05 गुन्हे उघड करुन त्यांचेकडुन गुन्हयामध्ये चोरीस गेलेला एकुण 17,76,014/- रुपये किंमतीच्या केबल वायर व मशीन तसेच 1,00,000/- किंमतीचा टेम्पो व वजनकाटा असा एकुण 18,80,014 रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करणेत आला आहे. वर नमुद चारही आरोपींना दिनांक 15/12/2025 रोजी अटक करणेत आली असुन सदरचे आरोपी हे सध्या पोलीस कस्टडीमध्ये असुन त्यांचेकडे अधिक तपास चालु आहे.

सदर कारवाई मध्ये श्री. तुषार दोशी, पोलीस अधीक्षक सातारा, श्रीमती डॉ.वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक सातारा यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अरुण देवकर, सपोनि रमेश गर्जे, रोहित फार्णे, पोउनि परितोष दातीर, विश्वास शिंगाडे, सफौ. अतीष घाडगे, पोहवा विजय कांबळे, संतोष सपकाळ, संजय शिर्के, शरद बेबले, ललैश फडतरे, लक्ष्मण जगधने, प्रविण फडतरे, अमित झेंडे, अजय जाधव, अमित सपकाळ, अरुण पाटील, अमित माने, अविनाश चव्हाण, स्वप्नील कुंभार, गणेश कापरे,ओंकार यादव, स्वप्नील शिंदे, मोहन पवार, विशाल पवार, रोहित निकम, पृथ्वीराज जाधव, सचिन ससाणे, रविराज वर्णेकर, संकेत निकम, चालक सफौ. शिवाजी गुरव यांनी कारवाईत सहभाग घेतला आहे. सहभागी अधिकारी अंमलदार यांचे पालीस अधीक्षक, सातारा, व अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी अभिनंदन केलेले आहे.

---

**आरोपीचे नाव** - 1.सारीश संजय सावळवाडे वय-23 वर्षे, रा.आगाशिव नगर, ता.कराड,जि.सातारा, मुळ रा.आष्टा, ता.वाळवा,जि.सांगली
2.दत्तात्रय जगन्नाथ झोरे वय-19 वर्षे रा.मु.पो.सडावाघापुर, ता.पाटण,जि.सातारा,
3.निलेश श्रीमंत सुर्यवंशी वय-27 वर्षे,रा.मु.पो.पाबळवाडी, ता.पाटण, जि.सातारा,
4.प्रमोद सरेश निकम वय-26 वर्षे, रा.मु.पो.मसुर,ता.कराड,जि.सातारा